# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com** **Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २०/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)**

आपत्ती प्राधान्य

**वाचा:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०.
४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.

**आदेश**

ज्या अर्थी, राज्यात कोरोना विषाणुमुळे (nCoV 19) उदभवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थीती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उदभवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्मान झाल्यामुळे राज्यात महाराष्ट्र शासनाने साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी संदर्भ क्र.४ च्या अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्याचे निर्देशीत केले आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.३ च्या अधिसुचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० लागू केले आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हयात कोरोना विषाणुच्या (COVId-19) प्रादुर्भावास किंवा प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमीत करण्यात आलेली अधिसुचना व महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० नियमावली मधील तरतुदीनुसार जिल्हयातील नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जालना जिल्हयामध्ये सभा, मेळावे, उपोषण, सामाजिक, सांस्कृतीक, राजकिय, धार्मीक, क्रिडा विषयक कार्यक्रमांना बंदी घालणे आवश्यक आहे तसेच नगर पालीका, नगरपंचायत व नगरपालीका व नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या क्षेत्रातील आणि जिल्हयातील सर्व ग्रामीण क्षेत्रातील सर्व रेस्टॉरन्ट, खानावळ, ढाबा, सर्व प्रकारची दुकाने [अत्यावश्यक किराणा (Grocery), दुध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तू व औषधालय (Chemist Shop) वगळून] दररोज सायंकाळी ८.०० वाजेनंतर बंद होणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सर्व संबधीतांना नोटीस देवुन त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे सदयपरिस्थीतीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याचीही माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, **रविंद्र बिनवडे, जिल्हादंडाधिकारी, जालना** असे आदेशीत करित आहे की, जिल्हयातील नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जालना जिल्हयामध्ये सभा, मेळावे, उपोषण, सामाजिक, सांस्कृतीक, राजकिय, धार्मीक, क्रिडा विषयक कार्यक्रमांना पुढील आदेशापर्यंत बंदी घालण्यात येत आहे. तसेच नगर पालीका, नगरपंचायत व नगरपालीका व नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या क्षेत्रातील आणि जिल्हयातील सर्व ग्रामीण क्षेत्रातील सर्व रेस्टॉरन्ट, खानावळ, ढाबा, सर्व प्रकारची दुकाने [अत्यावश्यक किराणा (Grocery), दुध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तू व औषधालय (Chemist Shop) वगळून] दररोज सायंकाळी ८:०० वाजेनंतर बंद करण्याबाबत आदेशीत करीत आहे.

सदर आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीसांनी जाहीर करुन त्यास प्रसिध्दी करावी असेही आदेशीत करीत आहे.

हा आदेश जालना जिल्हयातील नगरपालीका, नगरपंचायत व नगरपालीका व नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या आणि जिल्हयातील सर्व ग्रामीण क्षेत्राकरिता दिनांक २०/०३/२०२० पासुन पुढील आदेशापर्यंत लागु राहील.

या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

हा आदेश आज दिनांक २०/०३/२०२० रोजी माझ्या सहीनिशी देण्यात आला आहे.

(रविंद्र बिनवडे)

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जालना**

**प्रत — आवश्यक व माहीतीस्तव कार्यवाहीस्तव**

१. पोलीस अधिक्षक, जालना.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
३. उपविभागीय दंडाधिकारी जालना/अंबड/परतुर/भोकरदन.
४. तालुका दंडाधिकारी जालना/बदनापुर/अंबड/घनसावंगी/परतुर/मंठा/भोकरदन/जाफ्राबाद.
५. मुख्याधिकारी, न.प./न.पं, जालना/बदनापुर/अंबड/घनसावंगी/परतुर/मंठा/भोकरदन/जाफ्राबाद.
६. जिल्हा माहीती अधिकारी, जालना यांना देवुन आदेशीत करण्यात येते की, वरील आदेश वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करावा.